**सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा – 2017**

**प्रमाणपत्रे तपासणी कार्यक्रमाबाबत**

**घोषणा**

आयोगातर्फे दि. 25 जून, 2017 रोजी मुंबई केंद्रावर घेण्यात आलेल्या "**सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा** 2017 मधून गुणवत्तेनुसार **प्रमाणपत्रे तपासणीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या** उमेदवारांची यादी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर उमेदवारांनी त्यांची मूळ प्रमाणपत्रे व शासनाच्या संबंधित विभागप्रमुखांकडून प्रमाणित करुन देण्यात आलेल्या परिशिष्ट – 6 ची प्रत तसेच प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतींसह (2 संच) प्रमाणपत्र तपासणीसाठी उपस्थित रहावे. उमेदवारांना प्रमाणपत्रे तपासणीसाठी बोलाविण्याबाबतचे पत्र त्यांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करून दिले जाईल. प्रमाणपत्रे तपासणीचा सविस्तर कार्यक्रम लवकरच आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

2. विहित अटींची पूर्तता न करणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल तसेच प्रमाणपत्रे तपासणीसाठी अनुपस्थित राहिलेल्या उमेदवारांचा अंतिम गुणवत्ता यादीसाठी विचार केला जाणार नाही. प्रमाणपत्र तपासणीअंती विहित अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांची वर्गवारी, गुणवत्ताक्रम व प्रवर्गनिहाय पदसंख्या इत्यादी बाबी विचारात घेऊन शासनाकडे शिफारस करण्यात येईल. त्यामुळे प्रमाणपत्र तपासणीसाठी बोलाविण्यात आलेल्या व विहित अटींची पूर्तता करणा-या सर्वच उमेदवारांची शिफारस होईल असे नाही, याची उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

3. ज्या उमेदवारांनी अर्जात विजा(अ), भज(ब), विमाप्र, भज(क) व भज(ड) वर्गवारीचा दावा केला असेल अशा उमेदवारांनी आयोगातर्फे जाहिरात ज्या वित्तीय वर्षात (एप्रिल ते मार्च) दिलेली असेल त्या पूर्वीच्या वित्तीय वर्षापासूनचे क्रिमीलेअरमध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले नॉन क्रिमीलेअर (NCL) प्रमाणपत्र, तपासणीच्यावेळी सोबत आणावे.

ठिकाण : मुंबई<br>
दिनांक : 01/09/2017

**सु. सं. केसरकर**<br>
**उपसचिव**<br>
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**